## महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना बैठकीचे इतिवृत्त दि.१७/११/२०१८

| अ. क. | सर्वसाधारण विषय | कावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ शिक्षकांच्या थकित पगार देणे विषय चर्चा. | एकूण २२ अर्धवेळ शिक्षक आहेत. १ वर्ष उलटूनही जिल्हास्तरवर याबाबत कार्यवाही झालेली दिसून येत नाही.<br>सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अर्धवेळ शिक्षकांच्या थकित पगार देणे विषयी आपल्या अधिनस्त अधीक्षक (वेतन पथक) यांना तात्काळ सूचना द्याव्यात व अर्धवेळ शिक्षकांचे थकित वेतन लववकारात लवकर देण्याची कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी/ वेतन पथक स्तरावर | तात्काळ |
| २ | अर्धवेळ शिक्षक काम करीत असलेल्या शाळेत पूर्ण पद निर्माण झालेल्या ठिकाणी प्रथम सदर शिक्षकाची नेमणूक व्हावी. | अधेवेळ शिक्षकांचे पूर्णवेळ पदावर उन्नयन करणे ही धोरणात्मक बाब असल्यामुळे संघटनेने आपल्या स्तरावरुन शासनस्तरावर पाठपूरावा करावा. शिक्षकांची भरती येथून पुढे पवित्र प्रणालीद्वारे होणार आहे. | संघटना स्तरावर | -- |
| ३ | सदोष सेवा ज्येष्ठता यादी न स्विकारता योग्य यादी देण्यास मुख्याध्यापकांना आदेश व्हावेत. | सेवाज्येष्ठतेबाबत शासन परिपत्रक दि. १४/११/२०१७ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी. याबाबत सर्व शिक्षणाधिकारी यांनी संस्थाचालक/शाळा मुख्याध्यापक यांना शिक्षण उपसंचालक कार्यालयात आयोजित सहविचार सभांचा संदर्भ देवून पत्राद्वारे सूचना निर्गमित कराव्यात.<br>डिसेंबर पेड जानेवारी च्या वेतन देयकासोबत सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत असल्याबाबतचे मुख्याध्यापक यांचेकडून प्रमाणपत्र घ्यावेत. त्याशिवाय अधीक्षक, वेतन पथक यांनी वेतन देयके स्विकारु नयेत. | शिक्षणाधिकारी/ वेतन पथक स्तरावर | -- |
| ४ | अतिरिक्त शिक्षक नावे स्विकारताना सर्व बाबी पडताळून पाहण्यात याव्यात. जेणे करुन सदर प्रकणात हरकती न येता अधिकाऱ्यांना विनाकारण काम लावू नये. आणि त्याचबरोबर कोणत्याही शिक्षकावर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी वेळोवेळी संचालनालय स्तरावरुन निर्गमित परिपत्रके तसेच शासन स्तरावरुन निघालेल्या शासन निर्णय आणि एम.ई.पी.एस. १९८१ च्या नियमावलीमध्ये दिलेल्या सूचनांनुसार अतिरिक्त शिक्षकांची निश्चिती करावी. विशेषतः कोल्हापूर जिल्ह्याने याबाबत विशेष लक्ष द्यावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ५ | डि.सी.पी.एस. संदर्भात कपात होत असून त्या संदर्भातील कोणतीही माहिती सदर कर्मचाऱ्यास | याबाबत काही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. परंतु, ज्या कर्मचाऱ्यांची डि.सी.पी.एस. खाती उघडलेली आहेत अशा कर्मचाऱ्यांना डि.सी.पी.एस. | शिक्षणाधिकारी/वेतन पथक स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | समजत नाही. त्याबद्दल माहिती मिळावी. | कपातीच्या स्लिपा उपलब्ध करुन द्याव्यात. सर्व शिक्षणाधिकारी यांनी अधीक्षक, वेतन पथक यांना याबाबत सूचना निर्गमित कराव्यात. | | |
| ६ | खाजगी विना अनुदानित शाळांची संच मान्यता करुन घेण्यास सदर शाळेस आदेश व्हावेत. | खाजगी विना अनुदानित शाळांची संच मान्यता करुन घेण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी शाळा मुख्याध्यापक यांना सूचना द्याव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| **आयत्या वेळचे विषय -** | | | | |
| जिल्हा स्तरवरील संघटना बैठका आयोजित करणे. | | सर्व शिक्षणाधिकारी यांनी दि. ३०/११/२०१८ पूर्वी सर्व संघटनांच्या बैठका घ्याव्यात संघटनेकडून उपस्थित होणाऱ्या प्रश्न जिल्हास्तरावर सोडविण्याचा प्रयत्न करावे. तसेच संघटनांच्या सहविचार सभांचे दर तीन महिन्यात नियमित आयोजन करावे. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |

**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.**